"महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम
राज्यामध्ये राबविण्याबाबत .."

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

GMGT030801

**शासन निर्णय शुध्दिपत्रक क्रमांक : एमआयएस : १००७/सीआर-२३८/पोल-१५,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- २६ मार्च, २००८.**

**वाचा** : १) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक - एमआयएस : १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक - १९/०७/२००७.

**शासन निर्णय शुध्दीपत्रक** :- राज्यामध्ये "महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम" राबविण्याबाबत गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक एमआयएस : १००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक - १९/०७/२००७ निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयात पुढील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात येत आहेत -

१) परिच्छेद ६ (२) च्या, परिशिष्ट -२ मध्ये जिल्हा सल्लागार व अंमलबजावणी समितीची रचना नमुद केलेली आहे. सदर समिती मध्ये जिल्हाधिकारी - अध्यक्ष असे नमुद आहे . याऐवजी जिल्हाधिकारी - सदस्य असे वाचावे.

२) परिच्छेद ६ (२) च्या, परिशिष्ट -२ मध्ये जिल्हा सल्लागार व अंमलबजावणी समिती आणि जिल्हा स्तरीय कार्यकारी समितीची रचना नमुद केलेली आहे. सदर दोन्ही समित्यांमध्ये " विभागीय समाज कल्याण अधिकारी - सदस्य "असे नमुद आहे . याऐवजी " विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी - सदस्य " असे वाचावे.

३) परिच्छेद ५ अनुसार परिशिष्ट - १ मधील बिंदु (बुलेट) क्रमांक ४ येथे, " दिनांक ३१ मार्च पर्यत गावाच्या नोंदवहीत नोंदविलेले व नवीन निर्माण झालेले तंटे मिटविण्याचे प्रयत्न तंटामुक्त गाव समितीने करावेत." असे नमुद आहे. आणि शासन निर्णयातील नोंदवही - ३ (अ) बाबत " नव्याने (दिनांक ३० सप्टेंबर ते ३० एप्रिल,२००७) निर्माण झालेले तंटे " असे नमुद आहे, याऐवजी " दिनांक ३० एप्रिल पर्यत गावाच्या नोंदवहीत नोंदविलेले व नवीन निर्माण झालेले तंटे मिटविण्याचे प्रयत्न तंटामुक्त गाव समितीने करावेत." आणि शासन निर्णयातील नोंदवही - ३ (अ) बाबत "नव्याने (दिनांक ३० सप्टेंबर ते ३० एप्रिल) निर्माण झालेले तंटे " असे वाचावे. तसेच, , शासन निर्णयातील नोंदवही - ३ (ब) बाबत " नव्याने (दिनांक ३० सप्टेंबर ते ३० एप्रिल,२००७) निर्माण झालेले फौजदारी (नॉन कंपाउंडेबल) तंटे " असे नमुद आहे, याऐवजी "नव्याने (दिनांक ३० सप्टेंबर ते ३० एप्रिल) निर्माण झालेले फौजदारी (नॉन कंपाउंडेबल) तंटे " असे वाचावे.

४) परिशिष्ट - १ यामधील बिंदु (बुलेट) क्रमांक ८ " दरवर्षी दिनांक १ ऑगस्ट रोजी राज्यशासन, राज्यातील तंटामुक्त झालेल्या गावांची यादी जाहीर करेल" असे नमुद आहे. याऐवजी " दरवर्षी दिनांक ९ ऑगस्ट रोजी राज्यशासन, राज्यातील तंटामुक्त झालेल्या गावांची यादी जाहीर करेल " असे वाचावे.

५) परिशिष्ट - १ यामधील बिंदु (बुलेट) क्रमांक ९ " दरवर्षी दिनांक ९ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ मुंबई येथे आयोजित करुन मा. मुख्यमंत्री / मा. उपमुख्यमंत्री यांचे हस्ते पुरस्कारपात्र गावांचा जाहीर सन्मान करण्यात येईल " असे नमुद आहे. याऐवजी " दरवर्षी दिनांक १५ ऑगस्ट पूर्वी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण

समारंभ आयोजित करुन मा. मुख्यमंत्री / मा. उपमुख्यमंत्री यांचे हस्ते पुरस्कारपात्र गावांचा जाहीर सन्मान करण्यात येईल " असे वाचावे.

६) शासन निर्णयाच्या परिच्छेद ११ (४) च्या, परिशिष्ट ३ मधील "उदाहरण" येथील प्राप्त गुण मधील स्तंभ ४ मध्ये एकूण २०० पैकी, १५० ऐवजी १४० असे वाचण्यात यावे. आणि त्यापुढे शेरा या रिकाम्या स्तंभात " किमान गुणांची बेरीज १४० येत असली तरीही पात्रतेसाठी एकत्रित १५० गुण मिळविणे आवश्यक राहील " असे वाचावे.

७) उदाहरणाच्या अनुक्रमांक ७ च्या शेरा या स्तंभात "एकत्रित कमाल पैकी ९० % पेक्षा जास्त गुण (१९० पेक्षा पात्र ) मिळाल्याने २० % जादा बक्षिस रकमेसही पात्र" असे नमूद आहे. याऐवजी "एकत्रित कमाल गुणांपैकी ९५ % पेक्षा जास्त गुण (१९० पेक्षा जास्त गुण, पात्र ) मिळाल्याने २५ % जादा बक्षिस रकमेसही पात्र " असे वाचण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

मा.आ.गुट्टे
२६.१२.०८
(मा.आ. गुट्टे)
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**
**मा.राज्यपाल यांचे सचिव,**
**मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,**
**मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,**
**सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,**
**सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,**
**सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्यातील सर्व मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य,**
**सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य (पत्राद्वारे),**
**मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,**
**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,**
**सर्व पालक सचिव, मंत्रालय, मुंबई,**
**सर्व विभागीय सचिव, मंत्रालय, मुंबई,**
**सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,**
**सर्व विभागीय आयुक्त,**
**सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक,**
**सर्व जिल्हाधिकारी,**
**सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**सर्व पोलीस अधीक्षक,**
**सर्व उप विभागीय अधिकारी (जिल्हाधिकारी यांचेमार्फत),**
**(यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायांकित प्रती आपल्या नियंत्रणाखालील प्रत्येक मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील यांना पोहचविण्याची व्यवस्था करावी.)**
**सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी (पोलीस अधीक्षक यांचेमार्फत).**
**(यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या छायांकित प्रती आपल्या नियंत्रणाखालील प्रत्येक पोलीस ठाणे, प्रत्येक ग्रामपंचायत यांना पोहचविण्याची व्यवस्था करावी.)**
**सर्व गटविकास अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांचेमार्फत).**
**सर्व तहसिलदार (जिल्हाधिकारी यांचेमार्फत).**
**निवड नस्ती (पोल-८).**